**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, OCT-NOV, 2020, VOL- 8/42*

# सर्वसमावेशक समाजासाठी आनंददायी शिक्षण

**ज्योत्स्ना मोहन कांबळे, Ph. D.**

*सहायोगी प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय*

*Email- jotsnasonawane@gmail.com*

Scholarly Research Journal's *is licensed Based on a work at* www.srjis.com

**प्रास्ताविक** - सर्वसमावेशक समाजासाठी आनंददायी शिक्षण मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा गाभा समजला जातो. देशाचे शैक्षणिक सामाजिक आर्थिक स्थिती संतुलित राखण्यासाठी शिक्षण हे महत्त्वपूर्ण व सहाय्यभूत भूमिका बजावते. देशाचा उत्तम नागरिक घडून उत्तम दर्जेदार जीवन जगण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे हे सर्व केवळ मूलभूत शिक्षणाचा पाया मजबूत करून साध्य करता येऊ शकते हे ध्येय साध्य करण्यासाठी मानव संसाधन विकास मंत्रालय विविध विभागामार्फत काम करते.

भिन्न क्षमता असूनही विशेष गरजा असलेल्या बालकांना सामान्य बालकां समवेत एकाच वर्गात शिकण्याची समान संधी ज्या शिक्षणात दिली जाते, त्यास समावेशक शिक्षण म्हणतात. हे शिक्षण समान संधी तत्त्वावर आधारलेले आहे. या शिक्षण पद्धतीच्या मुख्य प्रवाहात सर्वांचा स्वीकार केला जातो

## इतिहास

1960 मध्ये सर्वांसाठी शिक्षण (Education for all) ही संकल्पना जगातील अनेक देशांत अस्तित्वात आली होती. या संकल्पनेस हळूहळू चालना मिळून तिचा 1981 च्या काळात प्रसार होऊ लागला 1990मध्ये सर्वांसाठी शिक्षण या संकल्पनेतून समावेशक शिक्षण या संकल्पनेचा उदय झाला. 1994 मध्ये भारतासह एकूण 92 देशाला आणि 25 शैक्षणिक संघटनांनी या संकल्पनेस मान्यता दिली व स्वीकारले आहे.1999मध्ये युनेस्को (United nation as educational scientific and cultural organization UNESCO)या संस्थेने नेहमीच शाळेतील भिन्न मुलांच्या गरजा नुसार सर्वांसाठी अध्यापन कार्यनिती विकसित करावी असे सुचवले. नुसतेच यामध्ये वंचित बालके, युवक ,प्रौढ यांच्या अध्ययन गरजांचा शोध घेत लक्ष केंद्रित करणारा विकासात्मक उपागम म्हणजे समावेशक शिक्षण. समावेशक शिक्षण व्यवस्थित विशेष खोली योजना आणि फिरता शिक्षक योजना (मोबाईल टीचर) अपेक्षित असतात. विशेष खोली

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

योजनेअंतर्गत बालकाच्या विशेष गरजा प्रमाणे खास शिक्षण साहित्य या विशेष खोलीत उपलब्ध करून दिलेले असते. फिरता शिक्षक योजनेत नियुक्त केलेल्या शिक्षकास अनेक समावेशक शाळांना भेटी देऊन साधने व उपकरणे यांची ने-आण करणे, वेळापत्रक तयार करणे, विशेष गरजांनुसार नियमित शिक्षकांची व शाळेच्या प्रमुखांशी विचार विनिमय करणे, विविध कार्यक्रमांचे नियोजन करणे इत्यादी अपेक्षित असते. सर्व तऱ्हेच्या मुलांना भेदभाव रहित शिक्षणाची समान संधी सर्वांना दर्जेदार शिक्षण या तत्वावर समावेशक शिक्षण चालते. 1994 मध्ये समावेशित शिक्षणाला विधीवत मान्यता मिळाली. कार्यक्रम मूल्यमापन विशेष मुलांच्या पालकांची संघटना अशा किशोर यांचे व्यवसायिक प्रशिक्षण संशोधन व विकास, इत्यादी मार्गदर्शक तत्त्वानुसार शिक्षणाची कार्यवाही करावी
असे ठरविण्यात आले.

**समावेशक शिक्षणाची वैशिष्ट्ये**

1. सामूहिक वृत्तीमुळे विद्यार्थ्यास सहकार्यात्मक अध्ययन प्रभावी वाटते.
2. सहकार्यात्मक अध्यापन मुळे नेतृत्व विकास सहभाग, आंतरक्रिया, गट बांधणी इत्यादी सामाजिक कौशल्य विकसित होतात.
3. सर्वांची प्रगती होणे हेच गटाचे यश या कार्यनितीनचे वैशिष्ट्य शिक्षकाने समजावून घेणे.
4. वर्गशिक्षकाने सर्व प्रकारच्या मुलांना विषय ज्ञान देताना अध्यापनातील उणीव भरून काढली पाहिजे.
5. विद्यार्थ्यांमध्ये स्व प्रतिष्ठा ,आत्मविश्वास वाढेल. खालच्या वर्गातील मुले वरच्या वर्गातील मुलांना शिकवितात.
6. उच्चार, भाषा, शरीर व व्यवसाय या संबंधित त्रुटी विशेष मुले व सामान्य मुले यांच्यातून दूर होण्यासाठी संबंधित उपचार तज्ञ गरजा निहाय उपचार करतात.
7. .या मुलांच्या शैक्षणिक, भावनिक व सामाजिक गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमात वेळोवेळी सुधारणा केल्या जातात.
8. ज्या शाळांकडे सर्व प्रकारच्या अध्ययनाच्या सुविधा असतात त्या शाळांमध्ये सर्व प्रकारच्या मुलांना प्रवेश देऊन शिक्षक व शिक्षण संस्था त्यांचे स्वागत करतात.
9. वैयक्तिक लक्ष देऊन सर्व उपक्रमांमध्ये शिक्षक त्यांना सहभागी करून घेतात.
10. सर्व मुलांना सामाजिक कार्याची माहिती दिली जाते.
11. मुलांच्या शैक्षणिक व इतर समस्या सोडविण्या करिता सर्व शिक्षक विचार-विनिमय करतात.
12. गरजू मुले शिक्षणापासून वंचित राहत नाहीत.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**आनंददायी शिक्षण कसे देता येईल?**

- बौद्धिक विकासाचे खेळ,
- सापसीडीचे खेळ
- प्रत्येक अंकाच्या स्थानावर भाषा, गणित, इतिहास, शास्त्र, भूगोल या विषयातील उदाहरणे,
- गुणवत्तापूर्ण शिक्षण
- ओझे मुक्त शाळा- शारीरिक विकासासाठी
- तंत्रज्ञानाचा वापर
- सर्वोत्कृष्ट उपक्रम मिळणारे शिक्षण आनंददायी असणे आवश्यक
- कलागुण सादर करण्याची संधी प्रत्येकाला मिळाली पाहिजे
- विविध मार्गदर्शनपर कार्यशाळा
- नृत्य प्रशिक्षण
- भाषा आणि वाचन क्लब
- योगा क्लब
- कलाकुसर क्लब
- आपत्ती व्यवस्थापन विषयी मार्गदर्शन
- डिजिटल क्लासरूम
- स्वसंरक्षणाचे धडे
- प्रशिक्षित समुपदेशक हवेत
- उद्बोधन वर्ग
- शाळा स्तरीय मूल्यांकन
- वाहतूक मदतनीस सुविधा
- मोफत शैक्षणिक साहित्य
- मध्यान्ह भोजन ,अल्पोपहार
- शाळेतील भौतिक सुविधा
- डिजिटल भांडार
- बक्षिसे आणि पारितोषिके
- चांगल्या कार्याची ओळख

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

- स्वच्छ विद्यालय पुरस्कार
- कृती आधारित अध्ययन
- बहुभाषिक शिक्षण
- विविध टप्प्यावरील संशोधने
- विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखणे
- मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासक्रम समृद्ध करणे.

आजच्या युगातील मुले बदलली आहेत. मुलांविषयीच्या आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे. पूर्वी शाळांमधून सैनिकी स्वरूपाच्या शिस्तीत खाली दबलेले शिक्षण व्यवस्था होती. या आधुनिक काळात यात बदल करणे खूप आवश्यक आहे बालकांना स्वतःच्या आचार विचारांचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्यांचे शिकणे केवळ अभ्यासक्रमातील विषयांची व शिक्षकांच्या शिकवण्यावर अवलंबून होते. शाळेत व घरी सुद्धा गप्प बसा, अभ्यास कर अशा सूचनांनुसार बालकांचा विकास क्रम चालत होता. मुलाची आवड-निवड वागण्या-बोलण्याची मोकळीक फारशी नव्हती. मात्र एकविसाव्या शतकात बालका बाबतची कितीतरी नवीन माहिती आज आपल्याला मिळाली आहे. त्यामुळे आजचे बालक हे एक पूर्वी पेक्षा वेगळे असे नवे बालक आपल्यापुढे आहे. त्याच्या नैसर्गिक क्षमता त्याच्या गरजा त्याच्या आवडीनिवडी बुद्धिमत्ता त्याची भावनिकता त्याचा आकलन वेग, अशा कितीतरी नवीन गोष्टींचा विचार करूनच त्याच्या शिक्षणाची योजना, सुविधा करणे आवश्यक आहे. बालकाच्या उदयाच्या जीवनात वळण लावण्याची जबाबदारी त्याच्या आजच्या शिक्षणाने करायाची असेल तर, त्यासाठी शिक्षण रचना ठरविण्याची जबाबदारी आपण घ्यायला हवी आहे.

1. शाळांमधील विषयाच्या शिक्षणात मुल्यशिक्षणाची जोड पाहिजे.
2. वेगवेगळ्या विषयाचे पायाभूत आकलन विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या क्षमताचे आकलन शिक्षकांना असेल अशी शिक्षण रचना आपल्याला आवश्यक आहे.
3. मुलाची सामाजिक एकता व वैयक्तिक भिन्नता याचा एकत्रीत विचार व्हायला हवा.
4. निसर्गातील विविध संस्था व पर्यावरणाची शुद्धता सांभाळणे.
5. संस्कृतीच्या विविधतेचा आदर बाळगणे.

वरील सर्व मुद्यांचा साकल्याने विचार केला तर सर्व स्तरावरील शिक्षणाची व्यवस्था आनंददायी होण्यास मदत होईल हा बदल घडवून आणायचा असेल तर शिक्षक पालक विद्यार्थी समाज प्रशासन यांचे सातत्याने प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे असे वाटते.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

## संदर्भ

*नवे बालशिक्षण रमेश पानसे ग्राम मंगल प्रकाशन पुणे*

*आनंददायी शिक्षण रमेश पानसे 2008*

*शैक्षणिक धोरण 2020*

*सर्वसमावेशक शिक्षण शालेय शिक्षणातील पुढाकार शिक्षण-प्रशिक्षण संच*

*जगताप एच एम शैक्षणिक प्रायोगिक मानसशास्त्र 2009*

*बंगाळे शै. समावेशित शिक्षण जळगाव 2016*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*